FORM-1 A N.C.R.B. 24

I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. 02, वर्ष 2023, दिनांक 31/05/23
   State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम-१९८८, कलमे Sections १३(१)(ई) सह कलम-१३(२) व
   (ii) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम-१९८८, कलमे Sections १३(१)(ब) सह कलम-१३(२) सह कलम-१२
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections भा.द.वि. कलम-१०९

3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून ०४/०१/२००८ वेळ ........, तारीख पर्यंत २५/०१/२०२३ ........
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ३०/०५/२०२३, वेळ ........
   Information received at P.S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ३०/२०२३, तारीख ३१/०५/२०२३, वेळ १८.३५
   General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव आलोसे यांची स्थावर व जंगम मालमत्ता असलेले ठिकाण, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name शिवराज मेहेत्रे (b) वडीलाचे / पतीचे नाव जगदीश
   Father's /Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय ४० वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. [illegible]
   Date of Birth & Age Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ........ दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
   Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste —, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता : ........ गल्ली / सर्वे नं. ........ घर / नाव नंबर ........ फोन / मो. नंबर ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
   Address ४२/१२ दादर पोलीस कॉलनी, क्रॉस मधुकर रोड, दादर (प) मुंबई
   Ward House/Name/No. Phone/M. No. Pan No. Card No.
   रस्त्याचे नाव ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ पो. स्टे. ........
   Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
   तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
   Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

१) लक्ष्मण भालचंद्र सुतार, वय ४७ वर्षे, धंदा-नोकरी (दुय्यम अभियंता, म.न.पा., आर/मध्य विभाग, बोरीवली (प), मुंबई-४०००९२) रा.टी. निवासस्थान नं ४, बी.एम.सी. स्टाफ वसाहत, [illegible] बिल्डींगचे शेजारी, बोरीवली (प), मुंबई-४०००९२.
२) सौ. सुनिता लक्ष्मण सुतार वय-४६ वर्षे, धंदा-नोकरी, राहणार वरील प्रमाणे

क

फिर्याद दि. १२।०१।२०२३.

श्री. शिवराज जगदिश म्हेत्रे, वय ४० वर्षे, धंदा - नोकरी (सहाय्यक पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई), रा.ठि. ०२।१२, दादर पोलीस कॉलनी, डी.एस. मध्कर मार्ग, दादर (प), मुंबई ४०००२८, यांचा सविस्तर जबाब संगणीकृत करण्यात आला असून तो सोबत जोडला असून तोच गुन्ह्याची पहिली खबर संबोधण्यात आली आहे.

समक्ष,

[signature]

(उमेश कोरडे)

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,

मुंबई.

[signature]

१२/०१/२३

**फिर्याद** दिनांक — १२/०१/२०२३ .

श्री शिवराज जगदिश म्हेत्रे वय— ४० वर्षे, व्यवसाय — नोकरी, सहाय्यक पोलीस आयुक्त, अॅन्टी करप्शन ब्युरो, मुंबई विभाग, सर पोचखानावाला रोड, वरळी मुंबई —३०, रा.ठि. ०२/१२, दादर पोलीस कॉलनी, व्ही.एस. मटकर मार्ग, दादर (प), मुंबई — ४०००२८, मो. क्रं. ८३५५९०१४४७.

— — —

मी वरील प्रमाणे असुन दिनांक मार्च २०२१ रोजी पासुन मी मुंबई विभाग येथे एक टप्पा पदोन्नतीवर सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत आहे.

ला. प्र. वि. मुंबई विभाग येथे आलोसे श्री. लक्ष्मण भालचंद्र सुतार वय ४७ वर्षे, धंदा—नोकरी, दुय्यम अभियंता, श्रेणी—०२, (बृहन्मुंबई महानगर पालिका, आर/मध्य विभाग, बोरीवली (पश्चिम), मुंबई नं—४०००९२. यांचेवर गु. र. क्रं. २१/२०२१, कलम ७ भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन त्यात त्यांना अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने आलोसे यांचे निवासस्थान नं. ०४, बी.एम.सी. स्टाफ क्वार्टर, एम.टी.एन.एल.बिल्डिंगच्या शेजारी, बोरीवली (पश्चिम) मुंबई—४०००९२ तसेच आलोसे यांच्या घराची दोन पंचासमक्ष पंचनाम्यातंर्गत घरझडती घेण्यात आली तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडिया, एस.व्हि.रोड, बांद्रा, (पश्चिम) या बँकेतील बँक लॉकरची दोन पंचासमक्ष पंचनाम्यातंर्गत झडती घेण्यात आली. सदर घरझडती व बँक लॉकरझडती मध्ये आलोसे यांचे स्थावर व जंगम मालमत्तेबाबत कागदपत्रे मिळून आल्याने मा. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी त्यांचेविरूध्द उघड चौकशी सुरू करण्याबाबत जा. क्र. ५८०३/लाप्रवि/ बीएमयु/उचौक्रं.३०/२०२१, दि. ०३.०५.२०२१ अन्वये उघड चौकशी क्रं. ३०/२१ च्या चौकशीकामी मा. वरीष्ठांनी आमची (सपोआ म्हेत्रे) नियुक्ती केली. चौकशीचे आदेश प्राप्त होताच आम्ही नमुद उघड चौकशीचा मा. वरीष्ठांना कृती आराखडा सादर करून त्याअंतर्गत आलोसे यांचा परिक्षण कालावधी ०४/०४/२००९ ते १५/०४/२०२१ रोजी पर्यंत निश्चित करण्यात आला. तसेच आलोसे यांचेकडुन मत्ता व दायित्वाचे १ ते ६ फॉर्म व स्वयंघोषणा पत्र भरून घेतले. तसेच आलोसे यांचे स्थावर व जंगम मालमत्ते बाबत माहिती मिळुन येईल अशा विविध शासकीय आस्थापनांना पत्रव्यवहार केला. आलोसे व संबंधीत व्यक्तींचे जबाब नोंद करण्यात आलेले आहेत. आलोसे व इतर व्यक्तींचे जबाब याद्वारे तसेच विविध आस्थापनांकडुन प्राप्त माहिती खालीलप्रमाणे :—

आलोसे व त्यांचा कौटुंबिक इतिहास खालील प्रमाणे.

कौटुंबिक इतिहास:—

आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार, वय ४६ वर्षे हे दिनांक ०१/०३/२०२० पासून, त्यांची पत्नी सौ. सुनिता लक्ष्मण सुतार वय ४० वर्षे, मोठी मुलगी नामे कुमारी दिव्या लक्ष्मण सुतार वय १९ वर्षे, मुलगा नामे कुमार पार्थ लक्ष्मण सुतार, वय १४ वर्षे यांचेसह रूम नं.०४ बी.एम.सी. स्टाफ क्वार्टर, एम.टी.एन.एल. बिल्डिंगच्या शेजारी, बोरीवली (पश्चिम) मुंबई — ४०००९२ या शासकीय निवासस्थानात राहत आहे. आलोसे हे सन २०१३ पुर्वी त्यांच्या स्वमालकीच्या ए/१३, स्टर्लीग निसर्ग, फेज—१, कैलास जीवन कंपनी जवळ, धायरी गांव, ता. हवेली जि. पुणे याठिकाणी रहावयास होते. सन २०१३ मध्ये आलोसे यांनी कुटंबियांना पुणे येथुन मुंबई येथे घेवुन आले. आलोसे हे मार्च २०१३ ते फेब्रु २०२० रोजी पर्यंत रूम नं. १९, म्युनसीपल मार्केट बिल्डींग, टर्नर रोड, बांद्रा (प), मुंबई याठिकाणी त्यांच्या कुटुबियांसह रहावयास होते.

आलोसे यांचे मुळ गांव मु.पो. मांजरी, ता. सांगोला जि — सोलापुर असे असुन सदर ठिकाणी मुळ गांवी त्यांचा लहान भाउ भारत भालचंद्र सुतार हा आई मंडोदरी सुतार व त्याचे मुलाबाळांसह वडीलोपार्जीत घरात राहतात. सुट्टीच्या कालावधीत आलोसे त्यांच्या कुटुंबासह गांवी जात असतात. आलोसे यांचे वडील श्री. भालचंद्र बाबुराव सुतार त्यांच्या मुळगांवी मांजरी येथे रहावयास होते. आलोसे यांचे वडिल मांजरी येथे च पोस्टमन म्हणुन तात्पुरत्या (टेम्परारी) स्वरूपात नोकरी करीत तसेच त्यांचा वडीलोपार्जीत सुतारीचा व्यवसाय करीत. सन २००२ मध्ये आलोसे यांचे वडील पोस्टमन म्हणुन सेवानिवृत्त झाले. त्यांची नोकरी तात्पुरत्या स्वरूपात असल्याने त्यांना निवृत्ती नंतर पेंशन मिळत नव्हती. आलोसे यांच्या वडीलांचे दि. २६/०३/२००५ मध्ये निधन झाले. आलोसे यांची आई नामे श्रीमती मंडोदरी भालचंद्र सुतार वय ६२ वर्षे ह्या अशिक्षीत असुन त्या गृहिणी आहे. आलोसे यांना एक बहीण व दोन भाउ आहेत.

आलोसे यांचा मोठा भाऊ नामे श्री.रामदास भालचंद्र सुतार वय ५० वर्षे हे त्यांची पत्नी श्रीमती रंजना रामदास सुतार वय ४२ वर्षे, मुलगा नामे अनिकेत, विशाल व मुलगी नामे कोमल यांच्यासह मु. पो. वडाळा, ता. द. सोलापुर, जि— सोलापुर येथे राहावयास आहेत. ते तलाठी या पदावर तालुका अक्कलकोट, जि. सोलापुर येथे नोकरीस असुन त्याची पत्नी रंजना या गृहिणी असुन मुले शिक्षण घेत आहेत.

दुसरा भाउ नामे श्री. भारत भालचंद्र सुतार वय ४४ वर्षे, हे आई नामे श्रीमती मंडोदरी सुतार, त्यांची पत्नी नामे श्रीमती मेघना वय ३३ वर्षे, मुलगा नामे प्रेम वय ८ वर्षे, मुलगी नामे श्रावणी वय ८ वर्षे यांचेसह आलोसे यांच्या मुळगांवी मु. पो. मांजरी, ता. सांगोला, जि. सोलापुर येथे वडीलोपार्जीत घरात रहावयास आहे. ते फॅबटेक एज्युकेशन सोसायटी, सांगोला, जि सोलापुर येथे लिपीक म्हणुन नोकरीस असुन त्यांची पत्नी मेघना या गृहिणी असुन मुले शिक्षण घेत आहेत.

लहान बहिण नामे मनीषा भालचंद्र सुतार वय ३३ वर्षे, धंदा— गृहिणी (लग्नानंतरचे नाव मनीषा राजकुमार सुतार ) असे असून सन २००१ मध्ये त्यांचे लग्न राजकुमार

जनार्धन सुतार, वय ४० वर्षे, यांचेसोबत झाले असुन सध्या त्या व त्यांचे पती राजकुमार सुतार व ०२ मुले यांचेसह मिरज, जि — सांगली येथे राहावयास आहे. त्यांचे पती सिक्युरिटी गार्ड म्हणुन मिरज एमआयडीसी मध्ये नोकरी करीत असुन दोन्ही मुले शिक्षण घेत आहेत.

आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांचा जन्म दिनांक ०५/१०/१९७३ रोजी त्यांच्या मुळगांवी मांजरी येथे झाला. त्यांचे ०१ ते ०४ पर्यतचे शिक्षण जिल्हा परीषद प्राथमीक शाळा, मांजरी ता. सांगोला, जि. सोलापुर येथे झाले. त्यानंतर ०५ ते १० पर्यंतचे शिक्षण मांजरी हायस्कुल, मांजरी त्यानंतर शासकीय तंत्रनिकेतन, सोलापुर येथे ईलेक्ट्रीकल या शाखेचा १९८९ ते १९९२ असे ०३ वर्षाचा डिप्लोमा केला आहे.

आलोसे यांचे लग्न श्री. नाना बेनीराम सुर्यवंशी, रा. ठि. केळकर चाळ, टेंबोडे रोड, पालघर यांची द्वितीय कन्या सुनिता नाना सुर्यवंशी यांच्याशी १६/०४/२००० रोजी झाले. सासरे एम.एस.ई.बी मध्ये पालघर येथे नोकरीस होते. आलोसे यांचे सासरे सन २०१८ मध्ये सेवानिवृत्त होवून सन २०२० मध्ये मयत झाले, तसेच सासू नामे सिंधुबाई नाना सुर्यवंशी हया गृहिणी असुन वयोवृद्ध आहेत. आलोसे यांच्या पत्नीस एक भाउ असुन त्यांचे नाव श्री. संतोष नाना सुर्यवंशी वय ३५ वर्षे, धंदा —नोकरी, रा.ठि. रॉयल कोर्ट बिल्डींग, डांगे चौक, चिंचवड, पुणे असे असुन ते टाटा मोटर्स, चिंचवड या ठिकाणी वरिष्ठ व्यवस्थापक या पदावर नोकरीस आहे.

आलोसे यांच्या पत्नी सुनिता लक्ष्मण सुतार यांनी औद्योगीक प्रशिक्षण संस्था, औंध, पुणे येथून ब्युटीपार्लर चा कोर्स व सार्वजनीक बांधकाम विभागाच्या विद्युत तारतंत्री परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. त्यापुर्वी त्यांनी बीकॉम शाखेत पहील्या वर्षापर्यंतचे शिक्षण पालघर येथील दांडेकर कॉलेज मध्ये शिक्षण घेतलेले आहे. आलोसे यांची पत्नी सौ. सुनिता लक्ष्मण सुतार आरोग्यसेविका म्हणुन ०१/०४/२०१३ रोजी पासुन के. बी. भाभा आरोग्य केंद्र, बांद्रा (प), मुंबई याठिकाणी मानधन तत्वावर नोकरी करीत आहे.

आलोसे यांना मोठी मुलगी व लहान मुलगा आहे. मुलीचे नाव दिव्या लक्ष्मण सुतार वय १९ वर्षे, धंदा—शिक्षण. दिव्या हीचे ०१ ली चे शिक्षण जीवनविकास इंग्लीश मेडीयम स्कुल, कोपरगांव, जि—अहमदनगर; २ री ते ४ थी पर्यंतचे शिक्षण ग्रीन एक्कर्स इंग्लीश मेडीकल स्कुल, सिंहगड रोड, धायरी फाटा, ता. हवेली जि— पुणे; ५वी ते १०वी पर्यंतचे शिक्षण सेंट जोसेफ कॉन्व्हेन्ट स्कुल, हिल रोड, बांद्रा ( प ) मुंबई; ११वी ते १२वी चे शिक्षण सेंट अंड्रयुज कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲड सायन्स, हिल रोड, बांद्रा मुंबई येथे शिक्षण झालेले असुन सध्या ती सेंट फ्रान्सीस टेक्नीकल इन्स्टीटयुट, बोरीवली ( प ) मुंबई येथे ईलेक्ट्रीकल शाखेत द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे.

आलोसे यांचा मुलगा नामे श्री. पार्थ लक्ष्मण सुतार वय १४ वर्षे, धंदा — शिक्षण. पार्थ याचे १ ली ते ८ वी पर्यंतचे शिक्षण सेंट स्टॅनीसलॉस स्कुल, हिल रोड, बांद्रा येथे

झालेले असुन तो सध्या इयत्ता १० वी मध्ये डॉन बॉस्को हायस्कुल, लिंक रोड, बोरीवली (प), मुंबई येथे शिक्षण घेत आहे.

आलोसे यांच्या वडीलांना एक भाउ व एक बहीण आहेत. चुलते नामे श्री. दत्तात्रय बाबुराव सुतार ६५ वर्षे हे मुळगांवी कुटुंबियांसह रहावयास असुन त्यांना दोन मुले व दोन मुली असुन ते सर्व विवाहीत आहेत.

**नोकरीचा इतिहास :—**

आलोसे यांचा डिप्लोमा पुर्ण केल्यानंतर १९९५ ते २००३ पर्यंत पुणे येथे तात्पूरत्या स्वरूपात विविध ठेकेदाराकडे सुपरवायझर म्हणुन त्यांनी नोकरी केली. सन २००४ मध्ये आलोसे यांची पत्नी नामे सौ सुनिता यांच्या नावे पुणे महानगरपालीकेचे शिवरत्न एंटरप्राईजेस या नावाने ठेकेदार नोदणी करून स्वतःच ठेकेदार म्हणुन पुणे महानगरपालीकेची ३ लाख रूपया पर्यंतची ईलेक्ट्रीकल कामे साधारणतः २००४ ते २००७ पर्यत करीत होते. आलोसे सन २००७ ते फेब्रु २००९ पर्यंत संजीवनी शिक्षण संस्था, कॉलेज ऑफ इंजीनिअरींग, कोपरगांव याठिकाणी मेंटनन्स इंजीनिअर म्हणुन तात्पुरत्या स्वरूपात नोकरी करीत होते. त्यादरम्यान बृहन्मुंबई महानगरपालीका येथे कनिष्ठ अभियंता या पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत आलोसे उत्तीर्ण झाल्याने दि. ०४/०४/२००९ रोजी बृहन्मुंबई महानगरपालीका येथे कनिष्ठ अभियंता म्हणून नोकरीस लागले

आलोसे बृहन्मुंबई महानगरपालिका मध्ये नोकरीस लागल्यापासून बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत खालील नमुद ठिकाणी त्यांच्या नेमणुका झालेल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उपप्रमुख अभियंता, यांत्रिकी व विद्युत (प. उपनगरे), आर/दक्षिण विभाग, बीएमसी, कांदीवली. | कनिष्ठ अभियंता | ०४/०४/२००९ ते २८/०८/२०१९ |
| २ | प्रमुख अभियंता, घनकचरा व्यवस्थपन, आर/ मध्य विभाग, बीएमसी, बोरीवली (प), मुंबई | दुय्यम अभियंता ( पदोन्नतीवर ) | ०६/०९/२०१९ ते १५/०४/२०२१ पर्यंत |

सदर उघड चौकशीमध्ये केलेल्या सविस्तर चौकशीमध्ये आलोसे व त्यांची पत्नी श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांचे एकूण उत्पन्न, एकूण खर्च, एकूण स्थावर व जंगम मालमत्ते संदर्भातील सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

**आरोपी लोकसेवक श्री. लक्ष्मण भालचंद्र सुतार यांची मालमत्ता, उत्पन्न व खर्च बाबत सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे.**

**(अ)—परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर/जंगम मालमत्ता—** **रु.३८,०२७/—**

| क्र. | (अ)—परिक्षण कालावधी पुर्वीची स्थावर मालमत्ता तपशील— | किंमत |
|---|---|---|
| | निरंक | ००/— |

**(अ)—परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर मालमत्ताचे विश्लेषण रु.** **००/—**

| | | |
|---|---|---|
| | निरंक | ००/— |
| | निरंक | ००/— |

| | (अ—१)—परिक्षण कालावधीपुर्वीची जंगम मालमत्ता तपशील— | किंमत |
|---|---|---|
| ०१ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांच्या नावे असलेली दोनचाकी हिरो होंडा सीडी १०० एसएस मोटार सायकल क्रमांक एम.एच. १२ बी.झेड ६७००. | ३८,०२७/— |
| | **परिक्षण कालावधी पुर्वीची एकूण जंगम मालमत्ता रक्कम....** | **३८,०२७/—** |

**(ब)—परिक्षण कालावधीतील स्थावर/जंगम मालमत्ता :—** **रु. ५६,२६,४२०/—**

| | (ब)—परिक्षण कालावधीमधील स्थावर मालमत्ता तपशील | किंमत |
|---|---|---|
| | निरंक | ००/— |
| | परिक्षण कालावधीमधील स्थावर मालमत्ता रक्कम..... | ००/— |

**(ब)—परिक्षण कालावधीमधील स्थावर मालमत्ता तपशिलाचे विश्लेषण.** **रु.००/—**

| | (ब)—परिक्षण कालावधीमधील स्थावर मालमत्ता तपशील | किंमत |
|---|---|---|
| | निरंक | ००/— |
| | परिक्षण कालावधीमधील स्थावर मालमत्ता रक्कम..... | ००/— |

| | (ब—१)—परिक्षण कालावधीमधील जंगम मालमत्ता— | किंमत |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ०१ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, अंधेरी (प), खाते क्रमांक ३०४३६९८८६५ खात्यावर जमा असलेली शेवटची रक्कम. | १,१७,३२७/— |
| ०२ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, टिळक रोड, पुणे, खाते क्रमांक ३०६२३९०२४६ खात्यावर जमा असलेली शेवटची रक्कम. | ६८,७२९/— |
| ०३ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, टिळक रोड, पुणे, खाते क्रमांक ३०६२३९०४२८ खात्यावर जमा असलेली शेवटची रक्कम. | ८३,५७५/— |
| ०४ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, बांद्रा, आर.डि खाते क्रमांक ३६४०३०६७९९ बांद्रा (प.) या खात्यावर जमा असलेली मुद्दल रक्कम. | १,२६,०००/— |
| ०५ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, बांद्रा, आर.डि. खाते क्रमांक ३५९३२०३४८० बांद्र (प.) या खात्यावर जमा असलेली मुद्दल रक्कम. | २,९५,२९०/— |
| ०६ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांच्या नावे सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, बांद्रा, आर.डि. खाते क्रमांक ३७१८१४०५२३ बांद्र (प.) या खात्यावर जमा असलेली मुद्दल रक्कम. | १,९८,०००/— |
| ०७ | बॅंक ऑफ इंडिया, बांद्रा, आर.डी. खाते क्रमांक ३४१८४४४५५६ टिळक रोड, पुणे या खात्यावर जमा असलेली मुद्दल रक्कम. | ३,९९,०००/— |
| ०८ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, एफ.डी. खाते क्रमांक ३४१८६३८५३० टिळक रोड, पुणे या खात्यावर गुंतवलेली रक्कम. | ६०,०००/— |
| ०९ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, एफ.डि. खाते क्रमांक ३४१८४४४७४८ टिळक रोड, पुणे या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | ६०,०००/— |
| १० | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, एफ.डि. खाते क्रमांक ३४८२१७४३०७ टिळक रोड, पुणे या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | २५,०००/— |
| ११ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, एफ.डि. खाते क्रमांक ३६४०५०४४१८ टिळक रोड, पुणे या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | ३,००,०००/— |
| १२ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, एफ.डि. खाते क्रमांक ३५१९४९७३४३ बांद्रा, (पश्चिम) या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | ४९,०००/— |
| १३ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, एफ.डि. खाते क्रमांक | १,००,०००/— |

| | | |
|---|---|---|
| | ३५९३१९८९६७ बांद्रा, (पश्चिम) या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | |
| १४ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, एफ.डि. खाते क्रमांक ३७२०७५३८६२ बांद्रा, (पश्चिम) या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | १,००,०००/— |
| १५ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, एफ.डि. खाते क्रमांक ३७२०७५३८२८ बांद्रा, (पश्चिम) या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | १,००,०००/— |
| १६ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, एफ.डि. खाते क्रमांक ३७१८१४०४३२ बांद्रा, (पश्चिम) य या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | ५,००,०००/— |
| १७ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया टिळक रोड, पुणे शाखा येथे एफ.डि. खाते क्रमांक ३६१४१९५६६१ या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | ३,७१,५५१/— |
| १८ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया टिळक रोड, पुणे शाखा येथे एफ.डि. खाते क्रमांक ३८७५०८२३६३ या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | १,५०,०००/— |
| १९ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया टिळक रोड, पुणे शाखा येथे एफ.डि. खाते क्रमांक ३६८५७३१८६९ या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | २,६१,०२३/— |
| २० | मारूती स्वीफ्ट कंपनीची मो/कार क्रं. एम.एच.०२ — ई झेड — २८९५ | ६,८१,५२१/— |
| २१ | हिरो स्कुटी क्र. एम.एच.क्र. ०२—इटी—२०८०. | ४८,८५६/— |
| २२ | एल.आय.सी पॉलिसी नं. ९५२५८९६१४ ची भरणा केलेली रक्कम. | ३१,६६०/— |
| २३ | आय.सी.आय.सी.आय.प्रुडेंन्शीयल पॉलिसी नं. ११२३७१४० ची भरणा केलेली रक्कम. | १,५६,०००/— |
| २४ | आय.सी.आय.सी.आय.प्रुडेंन्शीयल पॉलिसी नं. १६८४८८५२ ची भरणा केलेली रक्कम. | २,१५,५९४/— |
| २५ | आय.सी.आय.सी.आय.प्रुडेंन्शीयल पॉलिसी नं. १७४०६२५९ ची भरणा केलेली रक्कम. | २,१६,०००/— |
| २६ | टाटा ऐज पॉलिसी नं. १२७८४०५०९ ची भरणा केलेली रक्कम. | ४५,०००/— |
| २७ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांच्या घरझडतीमध्ये मिळून | २,७६,३००/— |

| | | |
|---|---|---|
| | आलेली जंगम मालमत्ता. | |
| २८ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, एस.व्हि.रोड, बांद्रा, (पश्चिम) या बॅंकेच्या लॉकरची झडतीमध्ये मिळून आलेली मालमत्ता. | ५,७९,४९५/— |
| २९ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी तनीष्क ज्वेलर्स, बांद्रा (प), पीएनजी ज्वेलर्स विलेपार्ले मुंबई व टायटन कंपनी यांच्या कडून खरेदी केलेले सोने | ००/— |
| ३० | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी खरेदी केलेला लिनोवा के १० पल्स बॅल्क,६४ जीबीचा मोबाईल. | ११,४९९/— |
| | **परिक्षण कालावधीमधील जंगम मालमत्ता रक्कम** | **५६,२६,४२०/—** |

**(क) आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांच्या उत्पन्नाचा तपशिल रु. ७०,६६,९४१/—**

| क्र. | (क)— उत्पन्नाचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांना शासकीय नोकरीतील निव्वल वेतन व भत्ते. | ५२,०५,२२१/— |
| ०२ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, अंधेरी (प), खाते क्रमांक ३०४३६९८८६५ खात्यावर जमा झालेल्या रक्कमेवर मिळालेले एकूण व्याज. | २२,२८८/— |
| ०३ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, टिळक रोड, पुणे, खाते क्रमांक ३०६२३९०२४६ (बाल भविष्य खाते) खात्यावर जमा झालेल्या रक्कमेवर मिळालेले एकूण व्याज. | १४,९२९/— |
| ०४ | सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया, टिळक रोड, पुणे, खाते क्रमांक ३०६२३९०४२८ (बाल भविष्य खाते) खात्यावर जमा झालेल्या रक्कमेवर मिळालेले एकूण व्याज. | १७,०७५/— |
| ०५ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी साई सर्विस प्रा.लि.कडून नविन मारूती स्विफ्ट क्रमांक एम.एच.०२ ई.झेड—२८९५ विकत घेताना सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया शाखा बांद्रा (प) यांचेकडून घेतलेले कर्ज. | ५,००,०००/— |
| ०६ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांच्या नावे असलेली जुनी मो/सा प्लेझर क्रमांक एम एच १२ डी व्ही ६२२५ ची विक्री करून मिळालेली रक्कम. | ९,०००/— |

| | | |
|---|---|---|
| ०७ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांच्या नावे एल.आय.सी.पॉलिसी नं.९५६४३८६१३. | २७,०३१/— |
| ०८ | आलोसे यांनी स्वतःचे व पत्नीचे नावे सेंट्रल बँक ऑफ इंडीया मध्ये विविध कालावधी मध्ये मुदत ठेवींच्या परीपक्वते नंतर मिळालेली एकुण रक्कम | ३,२९,७९०/— |
| ०९ | आलोसे यांनी स्वतःचे व पत्नीचे नावे सेंट्रल बँक ऑफ इंडीया मध्ये विविध कालावधी मध्ये गुंतवणुक केलेल्या आवर्ती ठेवींच्या परीपक्वतेनंतर मिळालेली रक्कम. | ९,४१,६०७/— |
| | **एकूण उत्पन्न रक्कम रूपये :—** | **७०,६६,९४१/—** |

**(ड) आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांच्या खर्चाचा तपशिल** **रू. ४०,१८,५७६/—**

| | **(ड)— खर्चाचा तपशिल** | **रक्कम** |
|---|---|---|
| ०१ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांच्या वेतनाच्या १/३ नाशाबीतीचा गृहखर्च. | १९,०६,९५५/— |
| ०२ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा, बांद्रा (प) यांच्याकडून घेतलेल्या वाहन कर्जावर कर्जाची परतफेड करताना भरलेले मुद्दल व एकूण व्याज. | २,५४,१६५/— |
| ०३ | मारूती स्वीफ्ट क्रमांक एम.एच.०२ ई.झेड. खरेदी करताना इन्शुरन्स करिता भरलेली एकूण रक्कम. | ००/— |
| ०४ | मारूती स्वीफ्ट कार सन २०१९—२०२० व सन २०२०—२०२१ या कालावधीसाठी भरलेली इन्श्युरन्सची रक्कम — | २३१६५/— |
| ०५ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी दिनांक १३/१०/२०१८ रोजी चारचाकी वाहन मारूती स्विफ्ट क्रमांक एम.एच.०२ ई. झेड. खरेदी करताना आर.टी.ओ.नोंदणी व आर.टी.ओ. रोड टॅक्स करीता भरलेली एकूण रक्कम. | ००/— |
| ०६ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी दिनांक १३/१०/२०१८ रोजी चारचाकी वाहन मारूती स्विफ्ट क्रमांक एम.एच.०२ ई. झेड. खरेदी करताना मेसर्स साई सर्व्हीस यांना Extended Wattanty म्हणून दिलेली रक्कम | ००/— |
| ०७ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी हिरो मॅजेस्ट्रो मोटर सायकल क्रमांक ०२ ईटी २०८० खरेदी करताना भरलेला आरटीओ टॅक्स व इतर खर्च. | १२,३५१/— |

| | | |
|---|---|---|
| ०८ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी हिरो मॅजेस्ट्रो मो/सा क्रमांक ०२ ईटी २०८० खरेदी करताना रोखीने दिलेली रक्कम. | १,३५०/— |
| ०९ | गै.अ.लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी हिरो मॅजेस्ट्रो मो/सा क्रमांक ०२ ईटी २०८०च्या सन २०१७ — २०१८ या कालावधीसाठी इन्श्युरन्ससाठी अदा केलेली रक्कम | २१६६/— |
| १० | गै.अ. यांच्या मुलगा व मुलीचा शिक्षणाचा एकूण खर्च | ३,२२,४२६/— |
| ११ | गै.अ. यांनी त्यांच्या ए/१३, स्टर्लींग निसर्ग, फेज—१, कैलास जीवन कंपनी जवळ, धायरी गांव, ता. हवेली, जि.पुणे या सदनिकेचा देखभाल खर्च. | ८१,४६२/— |
| १२ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी मो/कार व मो/सा च्या इंधनासाठी खर्च केलेली रक्कम | ७५,०००/— |
| १३ | आलोसे यांनी स्वतःचे व पत्नीचे नावे सेंट्रल बॅक ऑफ इंडीया मध्ये विविध कालावधी मध्ये मुदत ठेवीं मध्ये केलेली गुंतवणुक रक्कम | १,५६,०००/— |
| १४ | आलोसे यांनी स्वतःचे व पत्नीचे नावे सेंट्रल बॅक ऑफ इंडीया मध्ये विविध कालावधी मध्ये आवर्ती ठेवीं मध्ये केलेली गुंतवणुक रक्कम | ७,६४,४००/— |
| १५ | आलोसे यांनी नाशाबीतीच्या खर्चाव्यतीरीक्त बॅक खात्यातुन केलेला इतर खर्च | ४,१९,१३६/— |
| | **एकूण खर्च रक्कम रूपये :—** | ४०,१८,५७६/— |

**आरोपी लोकसेवक श्री. लक्ष्मण भालचंद्र सुतार यांची पत्नी सुनिता लक्ष्मण सुतार यांच्या मालमत्ता, उत्पन्न व खर्च बाबत सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे.**

(अ)—परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर/जंगम मालमत्ता— रु.४,५५,६००/—

| क्र. | (अ)—परिक्षण कालावधी पुर्वीची स्थावर मालमत्ता तपशील— | किंमत |
|---|---|---|
| ०१ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांची पत्नी श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांच्या नावे ए/१३, स्टर्लींग निसर्ग, कैलास जीवन कंपनी जवळ, धायरी गांव, तालुका हवेली, जि.पुणे. खरेदी केलेली मालमत्ता. | ४,५५,६००/— |

| | (अ—२)—परिक्षण कालावधीपुर्वीची जंगम मालमत्ता तपशील— | किंमत |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ००/— |
| | **परिक्षण कालावधीपुर्वीची एकूण जंगम मालमत्ता रक्कम....** | **००/—** |

**(अ)—परिक्षण कालावधीपुर्वीची जंगम मालमत्ताचे विश्लेषण रु. ००/—**

| | | |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ००/— |

**(ब)—परिक्षण कालावधीतील स्थावर/जंगम मालमत्ता— ००/—**

| | **(ब)—परिक्षण कालावधीमधील स्थावर मालमत्ता तपशील** | **किंमत** |
|---|---|---|
| | **निरंक** | ००/— |
| | **परिक्षण कालावधीमधील स्थावर मालमत्ता रक्कम.....** | **००/—** |

**(ब) परिक्षण कालावधीमधील जंगम मालमत्ता तपशिल :— ११,३५,६०३/—**

| | **(ब—१)—परिक्षण कालावधीमधील जंगम मालमत्ता—** | **किंमत** |
|---|---|---|
| ०१ | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, बांद्रा (प), खाते क्रमांक ३१९४९५४१६८ खात्यावर जमा असलेली शेवटची रक्कम. | २,४५,८२७/— |
| ०२ | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, टिळक रोड, पुणे, खाते क्रमांक ३०७८५३२३५४ खात्यावर जमा असलेली शेवटची रक्कम. | ५,८११/— |
| ०३ | म्युन्सिपल को.ऑप.बँक, बांद्रा सॅलरी खाते क्रमांक ३०१०००००४९६०१७५ खात्यावर जमा असलेली शेवटची रक्कम. | १,४२,४९४/— |
| ०४ | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, एफ.डी. खाते क्रमांक ३३३८७८९७५९ टिळक रोड, पुणे या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | २०,०००/— |
| ०५ | म्युन्सिपल को.ऑप.बँक, एफ.डी. खाते क्रमांक ३०१०००० १३३६४१९५ बांद्रा, (पश्चिम) या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | ३,००,०००/— |
| ०६ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांची पत्नी श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांच्या नावे सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, एफ.डी. खाते क्रमांक ३६८५७३१८६९ बांद्रा, (पश्चिम) या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम. | २,६१,०२३/— |
| ०७ | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया टिळक रोड, पुणे शाखा येथे एफ.डि. | १,२८,४४९/— |

| | | |
|---|---|---|
| | खाते क्रमांक ३६१४१९५६६१ या खात्यावर गुंतवणूक केलेली रक्कम | |
| ०८ | एल.आय.सी.पॉलिसी नं. ९५६४२८०२८ ची भरणा केलेली रक्कम. | २५,०००/— |
| ०९ | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांची पत्नी श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांनी तनीष्क ज्वेलर्स, बांद्रा (प), पीएनजी ज्वेलर्स विलेपार्ले मुंबई व टायटन कंपनी यांच्या कडून खरेदी केलेले सोने | ००/— |
| १० | आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी त्यांची पत्नी सुनिता लक्ष्मण सुतार यांच्या नावे खरेदी केलेला लिनोवा के०८पल्स विनोम बॅल्क,३२ जीबीचा मोबाईल. | ६,९९९/— |
| | **परिक्षण कालावधीमधील जंगम मालमत्ता रक्कम** | **११,३५,६०३/—** |

**(क) श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांचा उत्पन्नाचा तपशिल :— रु. २१,५६,४३३/—**

| क्र. | (क)— उत्पन्नाचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांना शासकिय नोकरीतील मिळालेले निव्वळ मानधन. | ५,७०,७७५/— |
| ०२ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, बांद्रा (प), खाते क्रमांक ३१९४९५४१६८ खात्यावर जमा झालेल्या रक्कमेवर मिळालेले एकूण व्याज. | ११,८८४/— |
| ०३ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, टिळक रोड, पुणे, खाते क्रमांक ३०७८५३२३५४ खात्यावर जमा झालेल्या रक्कमेवर मिळालेले एकूण व्याज. | ३,४६८/— |
| ०४ | म्युन्सिपल को.ऑप.बॅक, बांद्रा सॅलरी खाते क्रमांक ३०१५००००४९६०१७५ खात्यावर जमा झालेल्या रक्कमेवर मिळालेले एकूण व्याज. | १६,७२५/— |
| ०५ | आय.सी.आय.सी.आय प्रुडियनशील लाईफ इन्शुरस चे एजंट म्हणून काम करत असताना मिळालेले कमिशन. | ७०,५७१/— |
| ०६ | श्रीमती सुतार यांनी नोबेल अॅडव्हरटायझींग, विलेपार्ले या फर्म च्या अकाउंटींग च्या केलेल्या कामाबद्दल मिळालेले मानधन | ७,००,०००/— |
| ०७ | स्टर्लिंग सोसायटी, पुणे येथील सदनिकेचे श्रीमती सुतार यांचे बॅक खात्यावर जमा झालेले घरभाडे. | ४,८५,०००/— |

| | | |
|---|---|---|
| ०८ | श्रीमती सुतार यांनी इलेक्ट्रोकुल शिवडी यांचे वायरींगचे काम करून प्राप्त झालेली रक्कम. | ९८,०१०/— |
| ०९ | श्रीमती सुतार यांनी श्री. स्वामी इंटरप्राईजेस, कांजूरमार्ग या फर्म च्या अकाउंटीग च्या केलेल्या कामाबद्यल मिळालेले मानधन | २,००,०००/— |
| | **एकूण उत्पन्न रक्कम रूपये :—** | **२१,५६,४३३/—** |

**(ड) श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांच्या खर्चाचा तपशिल :— रू. २३,४९,४३३/—**

| अ.क्र | खर्चाचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | गै.अ. यांनी मुलगी नामे दिव्याच्या सीईटी क्लाससाठी केलेला खर्च. | ६६,४५०/— |
| २ | मारूती स्वीफ्ट कार क्रं. एम.एच.०२— इझेड — २८९५ खरेदी करताना दिलेली बुकींग साठी दिलेली रक्कम. | ००/— |
| ३ | मारूती स्वीफ्ट कार क्रं. एम.एच.०२— इझेड — २८९५ खरेदी करण्यासाठी सेंट्रल बॅकेकडुन घेतलेल्या कर्जफेडीसाठी दरमहा प्रमाणे दिलेली रक्कम. | ३,००,००० /— |
| ४ | ए/१३, स्टर्लींग निसर्ग, कैलास जीवन कंपनी जवळ, धायरी गांव, तालुका हवेली, जि.पुणे या फ्लॅटसाठी सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाची परीक्षण कालावधीत केलेली परतफेड | ३,०४,३४५/— |
| ५ | श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांनी त्यांचे नावे असलेल्या बॅंक खात्यातुन परीक्षण कालावधी दरम्यान मालमत्ता व खर्च या व्यतीरिक्त केलेला खर्च. | १६,७८,६३८/— |
| | **एकूण खर्च रक्कम रूपये** | **२३,४९,४३३/—** |

आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार व त्यांची पत्नी नामे सुनिता लक्ष्मण सुतार यांचे ''उत्पन्न'', ''खर्च'' व ''मालमत्ता'' याबाबत एकत्रित स्थिती खालीलप्रमाणे निष्पन्न झालेली आहे.

| अ.क्र. | विवरण | | लोकसेवक लक्ष्मण भालचंद्र सुतार | लोकसेवक यांची पत्नी श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार | एकूण |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | परिक्षण कालावधी मधील मालमत्ता | (विधान 'ब') | ५६,२६,४२० | ११,३५,६०३ | ६७,६२,०२३ |
| २ | परिक्षण कालावधी पुर्वीची मालमत्ता | (विधान 'अ') | ३८,०२७ | ४,५५,६०० | ४,९३,६२७ |
| ३ | परिक्षण कालावधी एकूण मालमत्ता | (ब—अ) | ५५,८८,३९३ | ६,८०,००३ | ६२,६८,३९६ |
| ४ | परिक्षण कालावधी एकुण खर्च | (विधान 'ड') | ४०,१८,५७६ | २३,४९,४३३ | ६३,६८,००९ |
| ५ | परिक्षण कालावधी एकुण मालमत्ता व खर्च | (३+४) | ९६,०६,९६९ | ३०,२९,४३६ | १,२६,३६,४०५ |
| ६ | परिक्षण कालवधी एकुण उत्पन्न | (विधान 'क') | ७०,६६,९४१ | २१,५६,४३३ | ९२,२३,३७४ |
| ७ | अपसंपदा | ( ५ —६) | २५,४०,०२८ | ८,७३,००३ | ३४,१३,०३१ |
| ८ | **कलम १३ भ्र. प्र. अधि. १९८८ मधील तरतुदी नुसार :—** <br> **अपसंपदेची टक्केवारी =** <br> अपसंपदा एकुण रक्कम X १०० = ३४१३०३१ X १०० = ४८.२९ <br> आलोसे यांचे एकुण उत्पन्न ७०६६९४१ | | | | |

सदर उघड चौकशीमध्ये आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार व त्यांची पत्नी नामे श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांच्या सर्व प्रकारच्या ज्ञात स्त्रोतातून मिळालेल्या उत्पन्नाचा विचार करून अपसंपदेची गणना केली असता आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार व त्यांची पत्नी नामे श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांची नमूद मालमत्ता ज्ञात उत्पन्नाच्या प्रमाणाशी विसंगत अशी रुपये ३४,१३,०३१/— इतकी अपसंपदा गैरमार्गाने संपादित केली असून त्यातील ८,७३,००३/— रू किंमतीची मालमत्ता त्यांची पत्नी श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांनी स्वतःच्या नावे बाळगुन गुन्हयास प्रोत्साहन दिल्याचे चौकशी अंती निर्दशनास आले.

तरी आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी परिक्षण कालावधी दिनांक ०४/०४/२००९ ते दिनांक १५/०४/२०२१ रोजी दरम्यान भ्रष्ट व गैरमार्गाने, कायदेशीर आणि ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक किंमतीची अशी ३४,१३,०३१/— म्हणजे (४८.२९ टक्के) किंमतीची मालमत्ता संपादित केली म्हणून आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ई) सह कलम १३ (२) व १३ (१) (ब) सह कलम १३ (२), अन्वये गुन्हा केला व आलोसे यांची पत्नी श्रीमती

सुनिता लक्ष्मण सुतार यांनी वरिलप्रमाणे नमुद संपत्ती मधील मालमत्ता स्वत:च्या नावे बाळगुन लोकसेवक लक्ष्मण भालचंद्र सुतार यांना हेतुपुरस्सर व बेकायदेशीरपणे अपसंपदा मिळवणे साठी प्रोत्साहन दिले म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १२ व भारतीय दंड संहिता कलम १०९ प्रमाणे गुन्हा केला म्हणून आलोसे लक्ष्मण भालचंद्र सुतार व त्यांची पत्नी श्रीमती सुनिता लक्ष्मण सुतार यांच्या विरूध्द् माझी सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलिखीत केलेला असुन तो मी वाचुन पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

( उमेश कोरडे )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

12/01/23
शिवराज ज. म्हेत्रे.
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

(8)

35808

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ...... चौकशी अंती.
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ......
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ......
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील लोकसेवक श्री. लक्ष्मण भालचंद्र सुतार यांनी लोकसेवक या नात्याने कर्तव्य करीत असताना दि. ४/१/२००८ ते ११/१/२०२१ या कालावधीत भ्रष्ट व गैर मार्गाने कायदेशीर व ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक किंमतीची एकूण रु. ३४,१३,०३४/- (४८.२९%) मालमत्ता संपादित केली. तसेच त्यांची पत्नी सौ. सुनिता लक्ष्मण सुतार यांनी सदर गैरकृत्यास त्यांना प्रोत्साहन देऊन, सदरची मालमत्ता स्वतःचे नावे बाळगली म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंधक १९८८ चे कलम-१३(१)(ई) सह कलम-१३(२) व १३(१)(ब) सह कलम-१३(२) सह कलम-१२ सह कलम-१०९ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......,
Action taken ; Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ...... Rank...... No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ...... (3) Transferred to P.S ......, District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression 12/01/23
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name उमेश महादा काटे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक,
तपासिक अं. चा कोड. क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई.
Posting
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**